प्रेसनोट

दि.06.04.2024

ठाणेनगर पोलीस ठाणे - अन्न सुरक्षा आणि मानके

दि.04.04.2024 रोजी 12.35 वा. चे सुमारास, गुन्हे शाखा, घटक-1, ठाणेचे पोउपनिरी/मारकड, पोशि/8243 सुरळकर व त्यांचे पथकास मिळालेल्या माहितीवरून, कळवा ब्रिज, साकेतकडे जाणा-या रोडच्या कोप-यावरील सार्वजनिक रोडवर, ठाणे पश्चिम येथे छापा टाकला असता, सदर ठिकाणी आरोपी रामक्रित लट्टु यादव, वय 40 वर्षे, व्यवसाय-चालक, रा.सुरत, गुजरात राज्य याने आयशर कंपनीचा टेम्पो क्र.एमएच-03-डीव्हि-407 या वाहनातुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य पदार्थ रजनीगंधा पान मसाला, राजनिवास पानमसाला, राजश्री पानमसाला, विमल पानमसाला, पुकार पानमसाला व सुगंधी तंबाखु असा टेम्पोसह एकुण 41,87,234/- रूपये किमंतीचा माल विक्रीकरिता बेकायदेशीररित्या वाहतुक करीत असताना मिळुन आला. सदर प्रकाराबाबत सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरून आरोपीविरूध्द गुन्हा रजि. नं. I 383/2024 भा.द.वि. कलम 328,272,273,34 सह अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 कलम 26(2),27,3,26(2)(iv),30(2)(अे) सह शिक्षा कलम 59 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी रामक्रित लट्टु यादव, वय 40 वर्षे यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/मारकड हे करीत आहे.

जन संपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्तालय,

ठाणे